# <u>नवी मुंबई महानगरपालिका</u>

महापालिका सचिव कार्यालय,
नवीन मुख्यालय, 3 रा मजला,
बेलापूर, नवी मुंबई - 400 614.
दिनांक 19 सप्टेंबर 2015.

## <u>निवेदन पत्रिका</u>

नवी मुंबई महानगरपालिकेच्या सर्व सदस्यांना याद्वारे असे कळविण्यांत येते की, मा. महापौरांनी निश्चित केल्यानुसार, **<u>महानगरपालिकेची ऑक्टोबर 2015 ची सर्वसाधारण सभा बुधवार, दिनांक 14 ऑक्टोबर 2015 रोजी सकाळी 11.00 वाजता बेलापूर, भूखंड क्रमांक 01, सेक्टर 15ए, नवी मुंबई महानगरपालिका, नवीन मुख्यालय येथील 5 व्या मजल्यावरील राजमाता जिजाऊ सभागृह</u>** येथे भरेल.

2. महापालिका सदस्यांना अशी विनंती करण्यांत येते की, ऑक्टोबर 2015 महिन्याच्या सर्वसाधारण सभेत, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 44 अन्वये, आयुक्तांना काही प्रश्न विचारावयाचे असल्यास असे प्रश्न **(जास्तीत जास्त 5 (पाच) )** आणि ठराव मांडावयाचे असल्यास ठरावाच्या सूचना **(जास्तीत जास्त 3 (तीन) ) <u>महापालिका सचिव</u>** यांचेकडे खालील तारखांच्या आत सचिव कार्यालयाच्या आवक विभागात पोहोचतील अशा रितीने पाठविण्यांत यावेत :-

| | | |
|---|---|---|
| 1. | ठरावाच्या सूचना. | गुरुवार, दि. 01 ऑक्टोबर 2015 पर्यंत. |
| 2. | महाराष्ट्र म.अधि.कलम 44 अन्वये विचारावयाचे प्रश्न. | |

**मा. महापौरांच्या आदेशावरुन,**

सही/-
**(चित्रा बाविस्कर)**
**महापालिका सचिव,**
**नवी मुंबई महानगरपालिका.**